बालकांचा मोफत व सक्तीच्या
शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९
राज्य सल्लागार परिषदेची स्थापना करणे

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः आरटीई २०१३/प्र.क्र.२५/प्राशि-१
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
तारीख: १९ मार्च, २०१३

प्रस्तावना §

सन २००२ मध्ये ६ ते १४ वर्ष वयोगटातील प्रत्येक बालकाला मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण (इयत्ता १ ते ८ वी) मिळण्याचा मुलभूत हक्क भारतीय राज्य घटनेत समाविष्ट करण्यात आला आहे. यानंतर बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ पारित झाला आहे. त्याची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २०१० पासून सुरू आहे. त्यानुसार ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना मोफत, सक्तीचे, गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य शासनावर आहे. राज्य शासनाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ च्या अधिसूचनेनुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ च्या अंमलबजावणीबाबत नियम प्रसिध्द केले आहेत.

२. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ चे कलम ३४ नुसार अधिनियमातील तरतूदींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनास सल्ला देण्याकरिता राज्य सल्लागार परिषदेची नियुक्ती करण्याची तरतूद आहे. सर्वसाधारणत: प्राथमिक शिक्षण व बालविकास क्षेत्रातील ज्ञान व अनुभव असणाऱ्या जास्तीत जास्त १५ सदस्यांची या परिषदेवर नियुक्ती करता येते.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ या खाली राज्य शासनाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ च्या अधिसूचनेने नियम प्रसिध्द केले आहेत. सदर नियमावलीतील अनुक्रमांक २५ नुसार राज्य सल्लागार परिषदेचे सदस्यांची अर्हता स्पष्ट केली आहे. सदर अर्हता व अधिनियमातील तरतूदी विचारात घेवून अधिनियमातील तरतूदींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनास सल्ला देण्याकरिता राज्य सल्लागार परिषदेची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय§**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ चे कलम ३४(१) मधील तरतूदीच्या आधारे खालील प्रमाणे **राज्य सल्लागार परिषद** गठीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

| अ.क्र. | नाव / प्रवर्ग | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.मंत्री, शालेय शिक्षण विभाग | अध्यक्ष |
| २ | मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग | उपाध्यक्ष |
| | **अशासकीय सदस्य** | |
| ३ | विशेष गरजा असलेल्या मुलांकरिताच्या शिक्षणाचे विशेषीकृत ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असलेली व्यक्ती (०१ सदस्य) | सदस्य |
| ४ | पूर्व-प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील विशेषीकृती ज्ञान असलेली व्यक्ती (०१ सदस्य) | सदस्य |
| ५ | अध्यापक शिक्षणाच्या क्षेत्रातील विशेषीकृती ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असलेली व्यक्ती ( ०२ सदस्य) | सदस्य |
| ६ | प्राथमिक शिक्षण व बालविकास क्षेत्रातील ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या व्यक्ती (०९ सदस्य) | सदस्य |
| | **शासकीय सदस्य** | |
| ७ | राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई | सदस्य सचिव |

| | | |
|---|---|---|
| ८ | सह सचिव/ उप सचिव (प्राथमिक) | निमंत्रित सदस्य |
| ९ | सह सचिव/ उप सचिव (माध्यमिक) | निमंत्रित सदस्य |
| १० | शिक्षण संचालक (माध्यमिक) | निमंत्रित सदस्य |
| ११ | शिक्षण संचालक (प्राथमिक) | निमंत्रित सदस्य |

( टिप-उपरोक्त अनुक्रमांक ३ ते ६ मधील किमान ४ सदस्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्यांक यापैकी असतील तसेच ५० टक्के सदस्य महिला असतील.)

२. या परिषदेतील अशासकीय सदस्य नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या मुदतीसाठी पदावर राहील. परंतू कोणताही सदस्य दोन मुदतीच्या कालावधी पेक्षा जास्त कालावधी पदावर राहणार नाही.

३. या परिषदेतील अशासकीय सदस्यांची नियुक्ती शासन करणार असून त्याबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित केले जातील.

४. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ चे तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनास सल्ला देणे अशी या परिषदेची कार्यकक्षा राहील.

५. या परिषदेची कार्यपध्दती, सदस्यांची अपात्रता/पात्रता तसेच अनुषंगिक बाबींसाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ या खाली राज्य शासनाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ च्या अधिसूचनेने प्रसिध्द केलेल्या नियमावलीतील अनुक्रमांक २५ येथील तरतूदी लागू राहतील.

६. या परिषदेच्या अशासकीय सदस्यांचे प्रवास खर्च व बैठक भत्ता याबाबत राज्य शासनाच्या वित्त विभागाकडून निर्गमित झालेल्या व होणाऱ्या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील.

७. या परिषदेच्या बैठका, प्रवास दौरे व बैठक भत्ता या प्रयोजनार्थ होणारा खर्च महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने त्यांच्या कार्यालयीन खर्चाच्या तरतुदीतून करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०३१९१११०४९११२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ना.उ.रौराळे )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२) मा. मंत्री (शालेय शिक्षण),
३) मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण),
४) मा. मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व),
५) मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व),
६) मा. मुख्य सचिव याचे स्वीय सहायक,
७) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
८) सर्व प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
९) सर्व विभागीय आयुक्त,
१०) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
११) सचिव, राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, शासकीय परिवहन सेवा केंद्राजवळ, वरळी पोलिस कॅम्प, वरळी, मुंबई - २५
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) सर्व आयुक्त, महानगरपालिका,
१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

१५) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,
१६) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७) शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१८) शिक्षण संचालक(प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१९) संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे,
२०) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे,
२१) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ(बालभारती), पुणे,
२२) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
२३) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
२४) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/प्रौढ), जिल्हा परिषद,
२५) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगर परिषद,
२६) सर्व प्रशासन अधिकारी, नगर परिषद/ कटक मंडळे,
२७) शिक्षण निरीक्षक (पश्चिम/ दक्षिण/ उत्तर), बृहन्मुंबई
२८) समितीचे सर्व अशासकीय सदस्य (महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांचेव्दारा)
२९) निवड नस्ती (प्राशि-१ कार्यासन)